मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि. ठाणे, 401 101.

25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र.मनपा/आस्था/1592/2026-27 **दि.**18 /11/2026

प्रति,
जनसंपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क विभाग,
मिरा भाईंर महानगरपालिका

विषय :- समान नागरी संहिता (UCC) समितीच्या कोकण विभागातील जनसुनावणीच्या अनुषंगाने उपयायोजना व आवश्यक तयारीबाबत

संदर्भ :- 1) मा. विभागीय समन्वय अधिकारी, समान नागरी संहिता समिती तथा अपर आयुक्त (महसूल) कोंकण विभाग यांचेकडील पत्र क्र. मशा/आस्था/प्रशासन/समान नागरी कायदा/२०२६, दि. १७/११/२०२६.
2) क्र.गृह/क-१/टे-३/UCC/जन सुनावणी/मनपा-जाहिर प्रकटन/कावि-२५७/२०२६, दि. १७/११/२०२६ रोजीचे मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडील पत्र.

महोदय,

समान नागरी संहिता (UCC) बाबत विविध हितसंबंधी गट, संस्था व नागरिकांच्या सूचना, हरकती आणि मते जाणून घेण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितीद्वारे ठाणे जिल्ह्यासाठी दि. २२/११/२०२६ रोजी जनसुनावणीचे आयोजन मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे व्हि. सी. द्वारे आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

सदर जनसुनावणीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.02 च्या सोबत जोडलेले जाहिर प्रकटन कार्यालयाच्या तसेच आपले अधिनस्त असलेल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेबाबत संदर्भ क्र.02 च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यकार्यालयाच्या नोटीस बोर्डवर सोबत जोडलेले जाहिर प्रकटन आज दि.18/11/2026 रोजी तात्काळ प्रसिध्द करण्यात यावे व त्याबाबत अहवाल लेखी स्वरुपात इकडील विभागास कळविण्यात यावा.

सोबत :- दि १७/११/२०२६ चे पत्र.

(सुनिल यादव)
सहा.आयुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

तातडीचे / महत्त्वाचे

क्र.गृह/क-१/टे-३/UCC/जन सुनावणी/मनपा-जाहिर प्रकटन/कावि-२५५ /२०२६ दि. १७/११/२०२६

प्रति,

मा. आयुक्त, महानगरपालिका, ठाणे / कल्याण-डोंबिवली / नवी मुंबई / मिरा भाईंदर / भिवंडी / उल्हासनगर

विषय :- समान नागरी संहिता (UCC) समितीच्या कोकण विभागातील जनसुनावणीच्या अनुषंगाने उपाय योजना व आवश्यक तयारीबाबत

संदर्भ :- मा. विभागीय समन्वय अधिकारी, समान नागरी संहिता समिती तथा अपर आयुक्त (महसूल) कोंकण विभाग यांचेकडील पत्र क्र. मशा/आस्था/प्रशासन/समान नागरी कायदा/२०२६, दि. १७/११/२०२६.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, समान नागरी संहिता (UCC) बाबत विविध हितसंबंधी गट, संस्था व नागरिकांच्या सूचना, हरकती आणि मते जाणून घेण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितीद्वारे ठाणे जिल्ह्यासाठी दि. २२/११/२०२६ रोजी जनसुनावणीचे आयोजन मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे व्हि.सी.द्वारे आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

तरी, सदर जनसुनावणीच्या अनुषंगाने सोबत जोडलेले जाहिर प्रकटन आपल्या कार्यालयाच्या तसेच आपले अधिनस्त असलेल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावेत व त्याबाबतचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

(डॉ.संदिप माने)
अपर जिल्हादंडाधिकारी, ठाणे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर:

१. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. मा. अपर आयुक्त (महसूल) तथा विभागीय समन्वय अधिकारी, कोकण विभाग.

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे – ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ – २५३४ ४७०५ / २५३४ ४७०९ ▪ ई–मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in

महसूल व वन विभाग
महाराष्ट्र शासन
विभागीय आयुक्त कोंकण विभाग यांचे कार्यालय
कोंकण भवन, १ ला मजला, नवी मुंबई-४००६१४
महसूल आस्थापना शाखा
दूरध्वनी क्रमांक-२७५७०३२३ ईमेल - konkanest@gmail.com



क्र.मशा/आस्था/प्रशासन/समान नागरी कायदा/२०२६ दिनांक – १७.११.२०२६

तातडीचे

प्रति,

मा.जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगर/ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

विषय:- समान नागरी संहिता (UCC) समितीच्या कोकण विभागातील जनसुनावणीच्या अनुषंगाने उपाय योजना व आवश्यक तयारीबाबत.

संदर्भ:- १) सहा. सॉलिसिटर-नि-उप सचिव, विधि व न्याय विभाग यांजकडील पत्र क्र.ठराव क्र.२०२६/प्र.क्र.१३/कार्या.१९, दि.०२.११.२०२६

२) सचिव, समान नागरी संहिता समिती, महाराष्ट्र राज्य यांजकडील पत्र दि.०३.११.२०२६

समान नागरी कायद्याबाबत (UCC) विविध हितसंबंधी गट, संस्था व नागरिकांच्या सूचना, हरकती आणि मते जाणून घेण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितीद्वारे कोकण विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, पालघर व सिंधुदुर्ग या जिल्हयांसाठी दि.२१.११.२०२६ रोजी व ठाणे, रायगड, रत्नागिरी या जिल्हयांसाठी दि.२२.११.२०२६ रोजी जनसुनावणीचे आयोजन विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथे तसेच संबंधित जिल्हयात व्हि.सी.व्दारे आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

सदर जनसुनावणीच्या अनुषंगाने जाहिर प्रकटन तहसिलदार कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, महानगरपालिका कार्यालय, नगरपरिषद/ नगरपंचात कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावेत व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे निर्देशानुसार)

Vindani

(वैशाली इंदाणी- उंटवाल)
विभागीय समन्वय अधिकारी,
समान नागरी संहिता समिती तथा
अपर आयुक्त (महसूल) कोंकण विभाग

Scanned with OKEN Scanner

जाहिर प्रकटन

कोकण विभागातील नागरीकांना जाहिर आवाहन करण्यात येते की, समान नागरी कायद्याबाबत (UCC) विविध हितसंबंधी गट, संस्था व नागरिकांच्या सूचना, हरकती आणि मते जाणून घेण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समिती द्वारे कोकण विभागाच्या जनसुनावणीचे आयोजन **विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई** येथे आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर जनसुनावणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	दिनांक	जिल्हा	वेळ	स्थळ
१	२१.११.२०२६	मुंबई शहर	११.०० ते १२.००	१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई (समक्ष) २) संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय (व्ही.सी.व्दारे)
२		मुंबई उपनगर	१२.३० ते १.३०	
३		पालघर	३.०० ते ४.००	
४		सिंधुदुर्ग	४.३० ते ५.३०	
१	२२.११.२०२६	ठाणे	११.०० ते १२.००	
२		रायगड	१२.३० ते १.३०	
३		रत्नागिरी	३.०० ते ४.००	

संबंधित गट, संस्था यांचे प्रतिनिधी आणि नागरिक यांना कोकण विभागीय आयुक्त यांचे कार्यालय/ संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय येथे निर्धारित दिवशी, निर्धारित वेळेपुर्वी १ तास सुनावणीकामी समक्ष उपस्थित राहता येईल. विभागीय आयुक्त कार्यालयातील उपस्थितांची सुनावणी समितीसमोर समक्ष घेण्यात येईल व जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या नागरीकांची सुनावणी व्हि.सी.व्दारे घेण्यात येईल.

तसेच ज्या नागरीकांना केवळ ऑनलाईन पध्दतीने आपले मत सादर करावयाचे आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या https://ucc.maharashtra.gov.in/ या पोर्टलवर ३७ मुद्दयांची माहिती देता येईल.

सही/-xxx
(रूबल अग्रवाल)
विभागीय आयुक्त कोकण विभाग